# दिव्यांग व्यक्तींसाठी

## सामाजिक उद्योजगता विकास कार्यक्रम

# शेळीपालन विषयी माहिती



आज व्यवसायाच्या दृष्टीने पशुधन क्षेत्रात प्रचंड प्रमाणात संधी असल्याची दिसून येत आहे. सगळीकडे रोजगाराचा प्रश्न उद्भवत असताना पशुधन हे उदरनिर्वाहाचे एक महत्वपूर्ण साधन बनत असल्याचे दिसते आहे. अशा परिस्थितीत बकरी पालन हा एक स्वत:चा व्यवसाय म्हणून सुरू करण्यासाठी एक चांगला पर्याय ठरतो. ग्रामीण भागात दूध, मांस आणि आपत्कालीन परिस्थितीत पैश्याची अडचण भागविण्यासाठी शेळी पाळतात. परंतु अडचण एवढीच आहे कि लोक या व्यवसायाला व्यवसाय समजत नाही आणि त्यातून हवा तेवढा उत्पन्न मिळवत नाहीत. दुसरे या व्यवसायातील शेळ्यांची काळजी कशी घ्यायची म्हणजे शेळ्यांची राहण्याची जागा, आजारांची ओळख आणि लसीकरण, खाद्य आदि. गोष्टींची व्यवस्थित माहिती नसल्याने शेळ्यांचे मृत पावण्याचे प्रमाणही जास्त आहे. त्यामुळे त्याचा उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो. एका शेळीची किंमत हि ५ हजार रुपयेच्या वर आहे त्यामुळे होणारे नुकसान हे मोठेच ठरते. त्यामुळे शेळ्यांची काळजी कशी घ्यायची आणि त्याला व्यवसाय बनवून त्यावर आधारित अधिकाधिक उत्पन्न मिळविण्यासाठी कसे प्रयत्न केले जावू शकते यासाठी मार्गदर्शक म्हणून हे माहिती पत्रक आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था द्वारा आपल्यासाठी बनविण्यात येत आहे.

### शेळी पालनाचे फायदे

१) शेळीपालन हे व्यवसाय कमी खर्चाचे असून व्यवस्थापन आणि पालन याचा खर्च कमी आहे.

२) स्थानिक जाती मध्ये वातावरण बदलाशी जुळवून घेण्याची क्षमता जास्त असते त्यामुळे व्यवसायातील जोखीम कमी आहे.

३) शेळीच्या व्यवसायाला बाजारात वाढती मागणी आहे त्यामुळे अधिकाधिक उत्पन्न मिळविता येते.

### शेळ्यांची निवड

बाह्यलक्षणामध्ये नाकपुड्या मोठ्या, डोळे पाणीदार, शरीर बांधा लांबट व मजबूत असावा, पायाची ठेवण सरळ व शरीर पुढे निमुळता व मांगे पसरट असावा, मागच्या दोन पायातील चौक रुंद, कास मोठी व दुध काढल्यानंतर लहान होणारी, शेळीच्या झालेल्या पिल्यांची चौकशी करावी.



### शेळ्यांच्या कांही उत्तम जाती ( महाराष्ट्रात जास्त प्रमाणात आढळतात ) खालीलप्रमाणे :

| शेळ्यांच्या जाती | ओळख चिन्ह |
|---|---|
| १. उस्मानाबादी ( महाराष्ट्र ) | रंगाने काळे असून, शिंगे मोठी पिळदार व मागे झुकलेले असतात तसेच पाय मजबूत असतात. या शेळ्या जुळे पिल्लू देण्यासाठी प्रसिद्ध आहेत. नर व मादी पिल्लु देण्याचे प्रमाण १:१ आहे. ( जुळे ) |
| २. बीटल ( पंजाब ) | रंग काळा पाय लांब, लांब सरळ, मटणसाठी उपयुक्त, दुधाळ, कान लांब, पोट सरळ असते. हि जात पंजाब मध्ये आढळते. |
| ३. बेरारी ( महाराष्ट्र ) | रंग तपकीरी/तांबा, पाठीवर काळा रंग, मानेवरती काळा पट्टा, मटणसाठा चांगला आहे पण जुळ्याचे प्रमाण कमी आहे. |
| ४. सिरोही ( राजस्थान ) | हि राजस्थानची जात आहे, ब्राउन रंगाची असते, शरीरावर पिवळ्या रंगाचे ठिपके असतात. बकरी ईद साठी याची फार मोठ्या प्रमाणात मागणी असते ( महाराष्ट्रात जळगावला याचा फार्म आहे. ) या जातींच्या शेळ्यांना अधिक खादय लागतो. |
| ५. जमनापारी ( उत्तर प्रदेश ) | हि जात उंचीने जास्त धिप्पाड असते, रंग पांढरा, नाक पोपटाच्या चोचीसारखा असतो, हि जात दुधासाठी प्रसिद्ध आहे, दुधाचे प्रमाण अडीच ते तीन लिटर असते. दुध लहान मुले आणि आजारी व्यक्तींसाठी विशेष उपयुक्त ठरते, यापासून चीज बनवितात, वर्षातून ती एकच पिलू देते यात जुळ्याचे प्रमाण फारच कमी ते एकदाच क्वचित असतो. |

### खाद्य तयार कसे करायचे? ( प्रमाण १०० किलो साठी )

- मक्का भरडा ६० किलो, किंवा कुकुस २० किलो, ढेप चुरी खंडा १४ किलो, खनिज मिश्रण २ किलो, गव्हाचा कोंडा ३ किलो, मिठ १ किलो यांचा मिश्रण करून पशु खाद्य बनविता येते
- **वाढत्या वयानुसार पिल्यांचा खाद्य:** मक्का ५५ किलो ग्राम, २७ किलो गवांडा, १५ किलो ढेप, २ किलो खनिज मिश्रण, मीठ १ किलो यांचे मिश्रण करावे
- **विक्रीच्या शेळीसाठी खाद्य:** मक्का २० किलो ग्राम, १७ किलो ज्वारी/बाजरी, तांदूळ आणि ढेप २० किलो ग्राम, गवांडा ४० किलो ग्राम, ०२ किलो मिनरल, त्यात १ किलो मीठ असा खाद्य विक्रीच्या शेळ्यांना द्यायला पाहिजे, शेळीला ३ लिटर शुद्ध थंड पाणी पाजावे

## वयानुसार खाद्य

| वय | चिक/दुध | खुराग/ खाद्य | हिरवा चारा | वाळलेला चारा |
|---|---|---|---|---|
| १ ते ७ दिवस | चिक वजनाच्या १० ग्राम | ०० | ०० | ०० |
| २ आठवडे ते ८ आठवडे | ३०० ग्राम दुध | १० ग्राम खाद्य | थोड्या प्रमाणात सुरुवात | थोड्या प्रमाणात सुरुवात |
| ७ आठवडे ते १०आठवडे | २०० ग्राम दुध | २०० ग्राम खाद्य | खाईल तेवढ द्यावे | खाईल तेवढ द्यावे |
| ११ आठवडेते १२ आठवडे | १०० ग्राम दुध | २०० ग्राम खाद्य | खाईल तेवढ द्यावे | खाईल तेवढ द्यावे |
| ४ महिने ते १२ महिने | १०० ग्राम दुध | २००ग्राम खाद्य | अडीच किलो | १/२ किलो द्यावे |
| मोठी शेळी | ०० | २५० ग्राम खाद्य | ३ किलो | ५०० किलो ग्राम |
| गाभण शेळी | ०० | ३०० ग्राम खाद्य | ३ १/२ किलो | ६०० किलो ग्राम |
| बोकड | ०० | ५०० ग्राम खाद्य | ३ १/२ किलो | १ किलो ग्राम |
| बिजाई साठी किवा पैदाशीसाठी ठेवलेल्या बोकडाला रोज मोड आलेले धान्य १, १, पाव द्यायला पाहिजे, | | | | |



## शेळीचे आजार, लक्षणे व उपाय

| शेळीचे आजार | आजाराचे लक्षणे | आजाराचे उपाय |
|---|---|---|
| फुफ्फुसदाह | न्युमोनिया होऊन फुफ्फुसात पाणी होणे, स्वसनास त्रास होणे | रोग प्रतिबंधक लस |
| फांसी | जीवाणू पासून हा आजार होतो, कातडी मध्ये रक्त जमा होणे, ताप येणे, नाकातून व तोंडातून रक्त बाहेर पडणे, हातपाय लुले पडणे | रोग प्रतिबंधक लस |
| देवी | विषाणू पासुन हा आजार होतो, शेळ्यांना ताप भरतो. | रोग प्रतिबंधक लस |
| एक टांग्या | हा आजार १ वर्षाच्या शेळ्यांना जास्त होण्याची शक्यता असते, जास्त खाद्य दिल्याने होऊ शकतो. | रोग प्रतिबंधक लस (Termycin / oxytetracylin) |
| घटसर्प | या आजाराने गळा सुजतो,श्वास घ्यायला त्रास जातो, चाराखाता येत नाही, जीभ बाहेर काढतो, जीभ पूर्ण लाल झालेली असते | प्रतिबंधात्मक लस H.S. (Hemareegic-Seffitisemiya) |
| आंतर विषार | हा बक्टेरियल आजार आहे. याचा आतड्यामध्ये विष होतो, पोटाला लाथा मारणे, बेचैन होते, पटकन उठबस होते, डोळे गरगर फिरविते, पोट फुगतो, तोंडातून फेस येतो, चकर येते गोलगोल फिरून झटके येतात, भिंतीला डोके आपटते. | प्रतिबंधात्मक लस Entrtoxicmia |
| धनुर्वात | T T, गंजलेल्या लोखंडाच्या वस्तू रुतल्या तर धनुर्वात होतो, जबडा कठीण होतो, अवयव ताठर होतात, नाकातून पाणी येते | प्रतिबंधात्मक लस Temp (तापमान) असते |
| गर्भपात | हा जीवाणू मुळे होतो, यात ४ किवा ५ महिन्याचा गर्भ बाहेर पडतो,थोडा फार प्रमाणात | रोग प्रतिबंधक लस Temp (तापमान) होतो |
| सांधे दुखी | तापमान १०.३ (डिग्री) १०.५ (डिग्री) असतो चालायला त्रास होतो | Teramycin |
| स्तनदाह | हा आजार जास्त दुध देणाऱ्या शेळ्यामध्ये होण्याचे प्रमाण असते, ए- कोलाय नावाच्या जीवाणू मुळे हा आजार होतो, | तज्ञ पशु वैदयकाकडून उपचार करावा. |
| खुर सडणे | (फूट रुठ ) हा आजार मोरचूद पावडर १/२ पाण्यात १० ग्राम टाकून स्वच्छ धुवावे | Antibiotic |
| FMD ( तोंड खुरी/ पायखुरी) लाळ्या खुरकत) | या आजाराने तोंडामध्ये काटे येतात, खाण्याची आणि रवंत करण्याची प्रक्रिया थांबते, त्याचप्रमाणे दोन खुराच्या मध्ये फोड येते त्यामुळे शेळ्या मरणाचे प्रमाण जास्त असते, तापमान १००.३ डिग्री असते, तोंडातून लाळ गळते शेळ्या चालू शकत नाही, | उपाशी जनावरांना गुळाचे पाणी पाजावे. नारळाचे पाणी पाजावे पातळ पदार्थ खाऊ घालावे. जखमेला पोटॅशिअम परमॅनगनेटने धुवावे. |
| पि पि आर | या आजारात तापमान असतो, पातळ आणि रक्त मिश्रित हगवण असते | कात दुधात मिक्स करून पाजावे |
| मावा | तोंडाच्या बाहेर बारीक बारीक फोड येतात, पु धरून खपली तयार होते, चार आणि दुध पिता येत नाही | तज्ञ पशु वैदयकाकडून उपचार करावा. |
| विमलीय अपचन | याने अल्कोहोल तयार होतो, त्यामुळे अपचन होतो, कारण प्रोटीन जास्त खाल्याने त्याचप्रमाणे शिळे अन्न खाल्याने | लिंबू पाणी पाजावे |
| निल्जीवी | या आजाराने जीभ काळपट निळसर पडते. ताप असतो, नाकातून पिवळा घट्ट शेंबडा बाहेर पडतो. जीभ कडक बनते, शेबड्या मुळे श्वास घ्यायला त्रास होतो, जनावर धापा टाकतो, चारा खायला त्रास होतो, केस बाहेर येतात | तज्ञ पशु वैदयकाकडून उपचार करावा. |

## शेळ्यांचे लसीकरण

| अ. क्र. | महिना | लसीचे नाव | मात्रा | | लस देण्याचा मार्ग | रोग प्रतिकार क्षमता टीकण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मोठी शेळी | लहान शेळी | | |
| १ | जानेवारी | C.C.P.P सर्दी | ०.२ मि.ली. | ०.२ मि.ली. | कातडी खाली | १ वर्ष |
| २ | एप्रिल / मे | ETV१ ४ दिवसांनी बुस्टर डोज | २.५ मि.ली. | २.५ मि.ली. | कातडी खाली किंवा IM | १ वर्ष |
| ३ | एप्रिल / मे | FMD | ५ मि.ली. | ५ मि.ली. | कातडी खाली किंवा IM | ६ महिने |
| ४ | मे / जून | PPR बुळकांडी | १ मि.ली. | १ मि.ली. | SC / IM | १ वर्ष |
| ५ | मे/जून/मार्च | H.S घटसर्प | २.५ मि.ली. | २.५ मि.ली. | SC / IM | ६ महिने |
| ६ | मे/जून/जुलै | एकटांग्या BQ | ५ मि.ली. | ५ मि.ली. | SC / IM | ६ महिने |
| ७ | ऑक्टोबर | Goat Pox देवी | ०० | ०० | कातडी वर | १ वर्ष |


मार्गदर्शक संस्था

AMHI AMCHYA AROGYASATHI

Initiative Supported By

BAJAJ FINSERV



अधिक माहिती करीता संपर्कः

**आम्ही आमच्या आरोग्यासाठी**

पत्ता : मु. पो. तह. : कुरखेडा, जिल्हा- गडचिरोली ( महाराष्ट्र राज्य ) - ४४१२०९

Mob. 9421006699 Email : arogyasathi@gmail.com

Website : www.arogyasathi.org

8275216488, 8788050684, 9527062684

REG. CIN NO. : U01100MH2021PTC362848

# संगती फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड

## ( संगती शेतकरी उत्पादक कंपनी )

देशाच्या वेगवेगळ्या ग्रामीण भागात शेतकरी उत्पादक कंपनी ( FPC ) ची स्थापना शेतकरी गटाद्वारे गेल्या दोन दशकांपासून केली जात आहे. ज्याचे उद्दिष्ट म्हणजे शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारणे आणि त्यांच्या उत्पन्नाची चांगली स्थिती सुनिश्चित करणे हे आहे. शेतकरी हे कंपनीचे भागधारक म्हणून उत्पादक असतात आणि कंपनीच्या आर्थिक उलाढालीतून मिळणाऱ्या नफ्यात त्यांचा वाटा असतो. नॅशनल सॅम्पल सर्व्हे रिपोर्ट २०१४ नुसार भारतातील ८५ टक्के शेतकरी हे लहान आणि अल्पभूधारक उत्पादक आहेत, ज्यामुळे त्यांचा उत्पादन कमी असतो ज्याचा थेट परिणाम त्यांच्या उत्पन्नावर होतो. त्यांना अशा शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्येमातून एकत्र आणल्याने त्यांच्या वैयक्तिक उत्पादक क्षमतेमध्ये वाढ होऊन बाजारपेठ्यांमध्ये आपल्या मालाची किंमत ठरवणे आणि जोखीम सुद्धा कमी करण्यात मदत होते. भारतामध्ये सामूहिक उपक्रमांच्या विविध संस्थात्मक स्वरूपांना प्रोत्साहन देण्याचे काम शासनाने सुद्धा केले आहे. त्यामुळे NABARD आणि इतर संस्था अशा कंपनीला वाढण्यासाठी आर्थिक सहाय्य आणि इतर फायदे देऊन सक्षम बनण्यासाठी मदत करत असतात. ह्या मोहिमेतून काही लोकांचे उत्पादनात चांगल्या प्रकारे वाढ झाली आहे. म्हणून आपल्या गडचिरोली, चंद्रपूर आणि भंडारा ह्या भागातील दिव्यांगाने आपल्या स्वयंबळावर संगती शेतकरी उत्पादक कंपनीची २८ जुन, २०२१ रोजी कंपनी एक्ट २०१३, नुसार कंपनीची नोंदणी करुन आपली एक विशिष्ट ओळख निर्माण केली आहे. कंपनीचे नोंदणी क्रमांक U01100MH2021PTC362848 हे आहे.

## संगती शेतकरी उत्पादक कंपनीचे उद्देश

- आपल्या दिव्यांग, एकल महिला, महिला व अल्प भूधारक शेतकरी बंधू-भगिनींना एकत्र करून आपल्या शेतमालाला सोयीस्कर बाजारपेठ निर्माण करण्यास सहाय्य करणे.
- उत्पादकता वाढवण्यासाठी नियमित मार्गदर्शन आणि सेवा देणे.
- शासनाकडून मिळणाऱ्या योजनांची माहिती शेतक-यांपर्यंत पोहोचवणे आणि त्या मिळण्यासाठी शासनाशी समन्वय साधणे.
- दिव्यांग, एकल महिला, महिला व अल्पभूधारक शेतकऱ्यांचे जीवन अधिक चांगले, आरोग्यदायी आणि अधिक समृद्ध करणे हे कंपनीचे अंतिम ध्येय आहे.

## कंपनी चालवणारे लोक कोण आहेत ?

आम्ही इतरांपेक्षा कमी नाही आणि तथाकथित सामान्य लोकांप्रमाणे कंपनी चालवू शकतो असे मानणारे या कंपनीचे नेतृत्व आम्ही दिव्यांग करत आहोत. **आम्ही शेळीपालन व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले असून नाशिक येथील युवा मित्र संस्थेमार्फत शेतकरी उत्पादन कंपनी चालविण्याचे प्रशिक्षणही घेतले आहे.** त्यामुळे तुम्ही कंपनीवर विश्वास ठेवून कंपनीचे सदस्य होऊन स्वतःचा आणि इतरांचा विकास करू शकता. या प्रक्रियेत आम्ही आमच्या आरोग्यासाठी हि संस्था कंपनीला सतत मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देत असते आणि कंपनीचे कामकाज हाताळण्यास सक्षम बनण्यासाठी कंपनीसोबत विशेष कार्यक्रम राबवत असते.

(कंपनी सध्या शेळीपालनाचा व्यवसाय करीत असून वनउपज खरेदी विक्री देखील करीत आहे. आगामी काळात कंपनी शेतीसह विविध व्यवसाय करणार आहेत. तथापि, आपण कंपनीचे सदस्य आणि भागधारक बनू शकता आणि कंपनीसह व्यवसाय करून नफा कमवू शकता)



## शेळी पालन व्यवसाय करत असताना येणाऱ्या समस्या :

१. शेळी आजाराने मरते, शेळीचे इन्शुरन्स नसल्यामुळे मेलेल्या शेळीचे नुकसान भरपाई होत नाही.
२. अत्यंत कठोर परिश्रम करुन सुद्धा शेळीला वाजवी दर मिळत नसल्याने शेतकरी शेळी पालन व्यवसाय करण्यास टाळत आहेत.
३. शेळीचे व्यवस्थापन आणि तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे शेळी बहुदा दगावून जाते.
४. शेळ्यांबाबत सरकारी योजनांची माहिती नाही आणि ती मिळवण्यासाठी पुरेसे ज्ञानही नाही.
५. शेळीला पोषक आहार मिळत नसल्याने वजन कमी राहतो त्यामुळे शेळीला भाव मिळत नाही.

**वरील समस्या टाळण्यासाठी कंपनी तुम्हाला कोणत्या सेवा देईल ( कंपनी जॉईन केल्यानंतर तुम्हाला मिळणारे फायदे )**

# कंपनी जॉईन केल्यानंतर तुम्हाला मिळणारे फायदे



आरोग्य आणि लसीकरण सेवा



वीमा सेवे सोबत जोडणे



कमी दरात पोषक खाद्य विक्री सेवा



गर्भधारणेदरम्यान काळजी सेवा



शेळीपालन युनिट स्थापननेसाठी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण सेवा



विविध जातीच्या शेळ्या विकल्या जातील



शेळी खरेदी विक्री सेवा दिल्या जातील

## कंपनीचे सुरु असलेले व्यवसाय



शेळी संसाधन केंद्र




शेळी खरेदी आणि विक्री




मटण शॉप




वनउपज खरेदी विक्री दुकान



इन्शुरेंस व इतर सर्विसेस

## कंपनीचे सभासद आणि शेअर धारक होण्यासाठीची अट

१. सभासद शुल्क - १००, आणि तो/ती कंपनीचे किमान ५ ते १० शेअर्स १०० रुपये प्रति शेअरने खरेदी करू शकते/तो.

२. त्याचा/तिचा शेळीपालन व्यवसाय असणे आवश्यक आहे किंवा शक्य तितक्या लवकर सुरू करण्यासाठीची त्यांची तयारी असावी.

३. जर तुम्ही कंपनीशी व्यवहार करत असाल तरच तुम्ही कंपनीच्या सेवांचा लाभ घेऊ शकता.

४. तुम्हाला कंपनीच्या सर्वसाधारण सभेला उपस्थित राहणे गरजेचे आहे.

५. कंपनीच्या व्यवसायात कोणत्याही प्रकारे अडथडे आणल्यास आणि कंपनीशी संबंधित समस्या योग्य प्रकारे मांडल्याशिवाय कंपनीची बदनामी केल्यास कंपनी योग्य ती कारवाई करेल.

टीप- कंपनी कुठल्याही प्रकारचे नौकरी देण्याचे आश्वासन किंवा हमी देत नाही




संगती फार्मर प्रोड्युसर कंपनी लि.

**कार्यालयाचा पत्ता:**
सी/ओ डॉ. सतिश वसंतराव गोगुलवार,
ॲट पो. तह. कुरखेडा, घर क्रमांक ७९, जवळ तालुका-कुरखेडा,
जि. गडचिरोली, महाराष्ट्र- ४४१२०९
**संपर्क क्रमांक :** ८२७५२१६४८८, ९०२२६२३०२०
Email: sangateefpc@gmail.com,
कंपनीची वेबसाईट : https://sangateefpc.com/

मार्गदर्शक संस्था

*Initiative Supported By*

BAJAJ FINSERV



# दिव्यांग व्यक्तीसाठी
## सामाजिक उद्योजकता विकास कार्यक्रम
# कुक्कुट पालन
## व्यवसायाबद्दल माहिती पत्रक

कुक्कुटपालन उद्योग अतिशय पारंपारिक आणि रूढीवादी पद्धतींमधून भारतातील गतिशील कृषी-आधारित उद्योगात रूपांतरित झाले आहे. अंडी गोळा करणे आणि मांस खाण्याच्या उद्देशाने कुक्कुट घरी खासकरून ग्रामीण भागात पालन करताना आपण बघतो. आतापर्यंत भारतातील ग्रामीण क्षेत्र अत्यंत फायदेशीर उद्योग म्हणजे पशुधन क्षेत्रात आहे असा मानण्यात येते. सोबतच नवीन विकसित जातीमध्ये बॉयलरचे वाढीचा दर १५ टक्के आणि गेल्या आर्थिक वर्षामध्ये ५ ते ७ टक्क्यांनी वाढला आहे. सध्याच्या परिस्थितीत, २०१०-२०११ दरम्यान सकल घरेलू उत्पादनात (जीडीपी) ८.२२ अब्ज डॉलर्सचे वार्षिक योगदान असलेल्या अंडी उत्पादनामध्ये भारताचा पाचवा क्रमांक लागतो. कुक्कुटपालन व्यवसाय करणे सोपे व फायदेशीर असे व्यवसाय आहे.



## कुक्कुट पालनाचे फायदे

ग्रामीण भागात करायला सोपे, कमी लागत जास्त उत्पन्न, गावराणी कोंबडी ची वाढती मागणी व कमी पुरवठा व शेती पूरक व्यवसाय म्हणून उत्तम पर्याय आहे.

## कुक्कुट पालन पद्धती

| | |
|---|---|
| खुली पद्धत | मोकाट पद्धत मध्ये कुक्कुट मोकाट सोडून देतात आणि परत रात्री त्यांना बेंडव्यात बंद करतात. हि पद्धत जरी खूप पारंपारिक असली तरी याचे परिणाम घातक असे बघितल्या गेलेले आहेत. कारण या पद्धीतीमुळे संसर्णजन्य रोग लागण्याची शक्यता जास्त असते. कुक्कुटला चारा द्यायची गरज पडत नाही. |
| अर्ध नियंत्रित पद्धत | या पद्धतीत कुक्कुट ला विशिष्ट जागेत/हद्दी मध्ये सोडून त्यांना गावातील अन्य कोंबड्यांच्या संपर्कात जाण्यापासून वाचवून ठेवते, यात चारा कमी लागतो. |
| बंदिस्त पद्धत | कुक्कुट पूर्णतः चार भीतीच्या आत ठेवून पालन केला जातो. या पद्धतीत कुक्कुट संपूर्णतः देखरेख मध्ये असल्याने आजारापासून दूर ठेवता येतो. चारा जास्त लागतो व वजन पण बाकी दोन पद्धती पेक्षा जास्त वेगाने वाढतो. घार, कावडे, मुंगुस, कुत्रा इत्यादी प्राण्यांपासून वाचवता येतो. |

## कुक्कुट पालनाचे व्यवस्थापन कसे करायचे?

| पावसाळ्यात | हिवाळ्यात | उन्हाळ्यात |
|---|---|---|
| पावसाळ्यात शेड मध्ये पाणी येऊ देऊ नये | थंड वाऱ्यापासून पक्ष्यांचे संरक्षण करावे | शेड वर भाताचा कोंडा व वाळलेले गवत |
| स्वच्छ पाणी प्यावयास देणे | शेड मध्ये तापमान वाढवावे ( बल्ब, शेगडी व ब्रुडर वापर करु शकता ) | शेडच्या बाजूला पोते लाऊन त्यावर पाणी मारावे |
| सतत राहण्याची जागा कोरडी ठेवावी | खाद्यात उर्जेचे प्रमाण वाढवणे | शरीरातील ताण कमी करण्यासाठी ग्लुकोज |

## कुक्कुट पालनाचे खाद्य व्यवस्थापन

- बाजारात कुक्कूटसाठी विशेष खाद्य तयार केलेले विकत मिळतात.
- मका व कणी खाद्य सुरवातीला दोन दिवस द्यावे.
- स्वच्छ भांड्यात खाद्य देणे त्यामुळे खाद्याचे नुकसान होत नाही.





# कुक्कुट पालनाचा खाद्य तक्ता

| अ. क्र. | खाद्याचे नाव | लहान पील्यांना | मोठे पील्यांना | अंडी देणाऱ्या पील्यांना |
|---|---|---|---|---|
| १ | मक्का | ४५ kg | ४५ kg | ३५ kg |
| २ | तांदूळ, ज्वार आणि बाजरा | मिश्रण करू नये | मिश्रण करू नये | १० kg |
| ३ | तांदळाचे तेल | २० kg | १५ kg | १० kg |
| ४ | तांदळाचे तेल न घेता | २० kg | २० kg | १० kg |
| ५ | सोयाबीन | १५ kg | १० kg | २० kg |
| ६ | शेंगदाणे | १० kg | ५ kg | ५ kg |
| ७ | सूर्य फुल | मिश्रण करू नये | मिश्रण करू नये | ५ kg |
| ८ | शुद्ध पाणी | मिश्रण करू नये | मिश्रण करू नये | ५ kg |
| ९ | चुनखडी | मिश्रण करू नये | मिश्रण करू नये | ५ kg |





## कुक्कुटला होणारे आजार, लक्षणे आणि उपाय

- कोलीबॅसिलोसीस

**लक्षणे :** कमजोरी, खाद्य कमी खाणे, वाढ खुंटणे, रोगाचा काळ लांबल्यावर यकृत, हृदय आणि आतड्यांमध्ये पातळ पांढऱ्या रंगाचे आवरण

**उपाय :** घरातील पाण्याची भांडी, खाद्याची भांडी यांची स्वच्छता राखावी. पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.

- गंबोरो रोग ( आय. बी. डी. )

**लक्षणे :** ३-६ आठवडे वयाच्या कोंबड्यांना होतो, पाणी व खाद्य कमी, मान खाली टाकणे, २०-५०% कुक्कुट मरण पावतात.

**उपाय :** अन्टीबायोटीक्स मल्टी व्हिटामिन, मेलेल्या कुक्कुट जाळून किंवा पुरून टाकने

- रानीखेत ( आर. डी. )

**लक्षणे :** खाद्य, पाणी घेत नाही, पांढरी, हिरवी विष्ठा करतात, उभे राहू शकत नाही, सगळे कुक्कुट मरण्याची शक्यता असते.

**उपाय :** अन्टीबायोटीक्स मल्टी व्हिटामिन, मेलेल्या कुक्कुट जाळून किंवा पुरून टाकने



- काक्सिडीओसीस

**लक्षणे :** खाणे पिणे कमी, पातळ विष्ठा, शरीराचे भाग पांढरे पडतात

**उपाय :** एम्प्रोलीयान



## कोंबड्यांचे लसीकरण

| पक्ष्यांचे वय दिवस/आठवडे | लसीचे नाव | लस देण्याची पद्धत |
|---|---|---|
| एक/पहिला दिवस | मॅरेक्स लस | स्नायुमध्ये/कातडीखाली (उबवणी केंद्रात दिली जाते) |
| ५ ते ७ दिवस (पहिला आठवडा) | लसोटा (रानीखेत) लाईव्ह | ड्रापरने डोळ्यात नाक छिद्रातून |
| १२ ते १४ दिवस (दुसरा आठवडा) | आयबिडी (गंबोरो) लाईव्ह इंटरमिदिएट स्ट्रेन किल्ड | डोळ्यातून कातडीखाली/स्नायूत |
| १८ ते २० दिवस (तिसरा आठवडा) | इन्फेक्शियस ब्रॉनयीटीस लाईव्ह | डोळ्यातून |
| २४ ते २६ दिवस (चौथा आठवडा) | आयडीबी (गंबोरो) लाईव्ह इंटरमिडीयट स्ट्रेन | पिण्याच्या पाण्यातून |
| २८ ते ३० दिवस (पाचवा आठवडा) | लासोटा (रानीखेत) लाईव्ह | पिण्याच्या पाण्यातून |
| ३२ ते ३५ दिवस (पाचवा आठवडा) | आयडीबी (गंबोरो) लाईव्ह इंटरमिडीयट स्ट्रेन | पिण्याच्या पाण्यातून |
| ४२ ते ४५ दिवस (सातवा आठवडा) | फाउल पॉक्स (देवी) | लॅन्सेटने त्वचेत देणे |


अधिक माहिती करीता संपर्क:

**आम्ही आमच्या आरोग्यासाठी**

पत्ता : मु. पो. तह. : कुरखेडा, जिल्हा- गडचिरोली ( महाराष्ट्र राज्य ) - ४४१२०९

8275216488, 8788050684, 9527062684, 9421006699

Email : arogyasathi@gmail.com | Website : www.arogyasathi.org

मार्गदर्शक संस्था



*Initiative Supported By*

BAJAJ FINSERV

# दिव्यांग व्यक्तीसाठी माहिती पत्रक

आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था, मागील चार दशकापासून समाजातील आदिवासी वंचित समूहातील लोकांसोबत कार्यरत असून बरेच सामाजिक व विकासात्मक बदल घडवून आणण्यात प्रयत्नशील आहे. संस्था, गाव समूह व शहर पातळीवर आढळलेल्या आरोग्य, आजीविका, महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि दिव्यांगांचे समुदाय आधारित विकलांगता पुनर्वसन या विषयांवर काम करीत असताना, सन २००१ मध्ये संस्थेने दिव्यांग बांधवांची समाजातील स्थिती जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नावर काम करण्यासाठी दिव्यांग व्यक्तीचे सन २००१ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील कोरची आणि कुरखेडा तालुक्यातील २५ गावचे सर्वेक्षण केले. त्यामध्ये, ६,७०० लोकसंख्ये पैकी १२१ लोक दिव्यांग असल्याचे सर्वेक्षणातून निष्पन्न झाले. त्यापैकी फक्त ५ व्यक्तीकडे दिव्यांग प्रमाणपत्र आणि ३ व्यक्तीकडे बस पास आढळून आले. दिव्यांग व्यक्तीकडे प्रमाणपत्र नसल्याने ती व्यक्ती कुठल्याही शासकीय योजनांचा लाभ घेऊ शकत नाहीत. म्हणून संस्थेने दिव्यांग व्यक्तींना त्यांचे अधिकार आणि असलेल्या योजनांचा लाभ घेता यावा, यासाठी समाजधारित दिव्यांग व्यक्तीचे पुनर्वसन प्रक्रियेची सुरुवात केली. त्यासाठी गाव पातळीवर दिव्यांग व्यक्तीचे स्वयं सहाय्यता समूह बनविणे, दिव्यांग व्यक्तीच्या परिसर संघटना बनविणे, तालुका संघटना, जिल्हा संघटना आणि विदर्भ दिव्यांग संघटना अशा एकूण ढाच्यामध्ये संघटनेचे काम सुरु आहें. सध्या गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तीचे १३२ बचत गट असून २५ परिसर व तालुका संघटना यांच्या मिळून विभागीय स्तरावर जवळपास ४००० दिव्यांगाची विदर्भ दिव्यांग संघटना आहे. त्यांच्या समस्या समजून घेऊन समस्यांचे अवलोकन करून शासन -प्रशासनाच्या समन्वयाने दिव्यांग व्यक्तीचे प्रश्न सोडविणे आणि त्यांना त्यांचे अधिकार मिळवून देण्याचे काम संस्था करीत आहे. समाजातील दिव्यांग व्यक्तीला सक्षम करणे आणि सक्षम लोकांना संवेदनशील बनविणे तसेच दिव्यांग व्यक्तींना सहकार्य करणे हेच या कामाचे उद्देश आहेत.

## दिव्यांगाचे प्रकार व लक्षणे

१ **पूर्णतः अंध**
दृष्टीचा अभाव, दृष्टीची कार्यक्षमता ६/६० किंवा २०/२० कोनात असेल तर ती व्यक्ती अंध म्हणून ओळखल्या जाते.

२ **अंशत अल्पदृष्टी**
डोळ्याला अतिशय चांगल्या प्रकरचा चष्मा लावूनही त्या डोळ्याची दृष्टी तिक्ष्णता ६/१८ पेक्षा कमी असेल तर ती व्यक्ती अल्पदृष्टी म्हणून ओळखल्या जाते. कमी दिसणे, पुस्तकातील मजकूर पाहताना, वाचताना आणि लिहताना अडचणी येणे, उपचार करूनही डोळ्यांना बरोबर दिसत नाही अशा व्यक्तीला अल्पदृष्टी व्यक्ती म्हणून ओळखल्या जाते.

३ **कृष्ठ रोग मुक्त**
अशी कृष्ठरोगी व्यक्ती जी औषधोउपचार करून बरी झालेली पण त्यामुळे आलेला क्षिणत्व आणि या क्षिणत्वामुळे त्याला दैनंदिन व्यवहार करण्यास येत असलेल्या अडचणी, चट्टे, विकृती व शरीरातील संवेदना कमी होणे म्हणजे कृष्ठ रोग मुक्त होय.

४ **कर्णबधीर**
श्रवण ऱ्हास झालेला व्यक्ती ६० डीसिबल पेक्षा अधिक कमजोरी असणे, डीसिबल हे व्यक्तीमधील श्रवणक्षमता मोजण्याचे माप आहे. कोणताही आवाज ऐकू न येणे.

५ **चलन विकलांगता**
चलन विकलांगता म्हणजे हाडात, सांध्यात अथवा कोणत्याही मांसपेशीत आलेली कमजोरी की ज्यामुळे हालचाल करण्यास अडचण होते किंवा अवघड जाते. याला चलन विकलांगता किंवा अस्थिव्यंग म्हणतात. हालचाल करण्यास अक्षम, सहज दिसणारा व्यंग.

६ **प्रमस्तीघात (मेंदूचा पक्षाघात)**
जन्मापूर्वी किंवा जन्मत: अथवा बाल्यावस्थेत मेंदूवर झालेल्या आघाताने या कमजोरीने वाढ खुंटतो आणि त्याची बुद्धिमत्ताही नाहीशी होते याला प्रमस्तीघात सिलेब्रल पाल्सी म्हणतात. हालचालीवर नियंत्रण नसते अवयवात ताठरत असते. मेंदूचा शरीरावर ताबा राहत नाही. हालचाल कमी असते.

७ **मतिमंदता**
मतिमंदता म्हणजे थांबलेला मानसिक विकास जो की सामान्य माणसापेक्षा वेगळा दर्शविते म्हणजे त्याचा शरीर डामडौल असतो, शरीर वाढीवर नियंत्रण नसतो, पण बुद्धीचा विकास मात्र खुंटलेला असतो, चेहऱ्यावरचे हावभाव वेगळे असतात. लक्षणाच्या संदर्भात सांगायचं झाल तर निरागसभाव, नैराश्यवादी दृष्टीकोन, परिस्थितीशी जुळवून न घेणे, याही प्रकारात काही प्रकार असतात, साधारण, सौम्य, तीव्र, अतितीव्र, याला वैद्यकीय भाषेत डाऊन सिंड्रोम असेही म्हणतात.

८ **मानसिक आजार**
मानसिकता ही बिमारी मतीमंदाहून वेगळी आहे. असामान्य किंवा अस्वाभाविक वर्तन खूप कमी किवा जास्त बोलणे. भयानक स्वप्न पडणे भ्रम या आभास होणे. कोणत्याही वस्तूला लगेच घाबरतात किंवा घाबरत नाही. बडबड करणे.वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष नसतो. मानसिक आजार हा मधेच आलेला आजार असतो, हा आजार ताण तणाव यातून निर्माण झालेला असतो. हा आजार नियमित औषध घेतल्याने आटोक्यात येवू शकतो.

९ **स्वमग्न**
स्वमग्नता म्हणजे स्वत:मध्येच मग्न असतो आणि आपल्या आवडीनुसार वर्तन करने. व कल्पना विश्वात रमने. या आजाराचे व्यक्ती स्वतःच्या विश्वात असतात. भाषिक कौशल्य कमी विकशीत झालेले असतात. राग व्यक्त करणे. हसणे.रडणे, इत्यादीचा अभाव.

१० **बहुविकलांगता**
दोन किंवा दोनपेक्षा जास्त विकलांगता एकत्र असेल तर आपण त्याला बहुविकलांग संबोधल्या जातो. उदा अंधत्व आणि शारीरिक विकलांगता

११ **खुजा (बुटकेपणा)**
व्यक्ती प्रौढ झाला तरी त्याची उंची ४ फुट १० इंच १४७ सेंटी मीटर पेक्षा कमी असते.यात शरीर यष्टी फार धष्टपुष्ट होते पण उंची वाढत नाही त्यामुळे हे व्यक्ती इतराच्या मानाने उंचीने कमी असतात.

१२ **तेजाब हमला (असिड ॲटॅक)**
तेजाब हमल्यामुळे कुरूपता येते. शरीराच्या कोणत्याही अवयवावर तेजाब पडला तर तो भाग जळतो आणि व्यंगत्व येते, चेहराभाजल्या सारखा दिसतो. चेहऱ्यावर / शरीरावर ॲसिड ॲटॅक झालेला भाग कुरूप दिसतो,

१३ **मासपेंशी क्षरण (मस्क्युलर डिस्ट्रॉफी)**
ज्या मासपेंशी असतात त्यात कमजोरी किंवा विकृती येणे. त्यामुळे व्यक्ती अतिशय दुबळा आणि बारीक होऊन काम करण्यास कमजोर पडतो. उभा राहताना दुसऱ्याचाआधार घ्यावा लागतो.

१४ **स्पेसिफिक लर्निंग डीसाबीलीटी**
या अपंगत्वामुळे व्यक्तीच्या बोलण्यात ऐकण्यात, लेखन करण्यात, गणित प्रक्रिया, अध्ययन तसेच धावण्यात अडचणी येतात.

१५ **बौधिक अक्षमता**
शिकण्यात समजून घेण्यात तर्कशक्ती कमी. दैनिक कामे करण्यास अडचणी, नवीन गोष्टी समजण्यास अडचणी येतात.

१६ **मल्टीपलस्क्लेरोसीस**
हाडा हाडातील दुर्मिळता व कमजोरी

१७ **सिकलसेल (आजार SS)**
रक्ताचे प्रमाण कमी असते. रक्ताच्या कमतरतेमुळे शरीरातील अवयव अशक्त होतात.तसेच शरीरात रक्त गोठण्याचे प्रमाण अधिक असते, यात सतेज पणा नसतो, नेहमी अशक्तपणा जाणवत असतो

१८ **कंपवात रोग**
डोपामिन रेणूच्या अभावामुळे रोग्याला कंप सुटतो हालचाली संथ होतात स्नायू ताठर होतात. वजन कमी होत जाते. ५० ते ६० वयोगटातील लोकात हा आजार दिसतो.

१९ **अधिक रक्त स्राव**
हा अनुवान्सिक रक्तविकार आहे. रक्त वाहिन्यातील बिघाडामुळे हा आजार होतो. रक्तस्राव अधिक झाल्याने शरीराचा फुगा फुगतो.

२० **थॅलेसेमिया**
रक्ताची कमतरता वारंवार रक्तपुरवठा करावा लागतो, चेहरा सुकलेला दिसतो. वजन वाढत नाही श्वास घेण्यास अडचणी येतात. नेहमी आजारी पडतात.

२१ **मज्जासंथेचे तीव्र आजार**
मेंदूमध्ये चेता संस्थेच्या क्षतीमुळे मेंद, पाठीचा कणा व इतर नसामध्ये विकृती झाल्याने हा आजार होतो

## दिव्यांग व्यक्ती विषयीचे कायदे

- १९८६ मानसिक आरोग्य कायदा
- १९९४ मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा
- १९९५ चा समानसंधी हक्काचे संरक्षण व पूर्ण सहभाग
- १९९९ चा राष्ट्रीय न्यास कायदा
- २०१६ दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा


## महत्वाचे शासननिर्णय

। १) १७ जुलै २०१३ च्या शासननिर्णय अन्तोदय योजनेचा लाभ । २) २४ सप्टेंबर २०१३ चा शासन निर्णय ग्रामपंचायत मध्ये दिव्यांग व्यक्तीच्या नोंदनी करणे । ३) २ आक्टोंबर २०१३ च्या शासननिर्णयानुसार मनोधैर्य योजना । ४) १७ जून २०१४ च्या शासन निर्णय विवाह प्रोत्साहन योजना । ५) १० मार्च २०१५ च्या शासननिर्णय सिकलसेल व्यक्ती आणि सोबत यांना मोफत बस सेवा । ६)५ जानेवारी १०१६ च्या शासननिर्णय शबरी आदिवासी घरकुल योजनेमध्ये BPL अट शिथिल । ७)४ आक्टोंबर २०१७ च्या शासन निर्णयानुसार नैसर्गिक आपत्तीने मृत्यू पावल्यास मिळणारा लाभांश । ८) २५ जून २०१८च्या शासननिर्णय. दिव्यांग व्यक्तीच्या विविध योजना । ९) ३ नोव्हेंबर २०१८च्या शासननिर्णय मानधनामध्ये वाढ । १०)२१ डिसेंबर २०१८ च्या शासननिर्णय वि व वि मा थेट कर्ज मर्यादा वाढ । ११)३१ डिसेंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार रमाई आवास घरकुल योजनेमध्ये BPL अट शिथिल । १२)४ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयानुसारदिव्यांग व्यक्ती सल्ला व मार्गादर्शन केंद्र उभारणी । १३) २१ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयानुसार दिव्यांग व्यक्तिला स्वतंत्र शिधा पत्रिका देणे.

# दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या योजना

| अ.क्र. | दिव्यांग व्यक्ती साठी असलेले योजना | योजना मिळवून घेण्याचे कार्यालय | योजनेला लागणारे कागद पत्र |
|---|---|---|---|
| १ | केंद्र शासनाच्या धरतीवर दिव्यांग असल्याचे त्या संदर्भातील सर्व लाभ मिळविण्यासाठी UDID दिव्यांग प्रमाणपत्र व स्वावलंबन कार्ड बंधनकारक | जिल्हा सामान्य रुग्णालयात जाऊन दिव्यांग प्रमाण पत्र काढणे (ऑनलाईन प्रक्रिया करण) | आधार कार्ड (पुर्ण जन्म तारीख) / राशन कार्ड / दोन पासपोर्ट फोटो, जुने प्रमाणपत्र असल्यास सोबत ठेवणे.<br>दिव्यांगाचे प्रमाण पत्र, जन्माचा पुरावा, दोन पासपोर्ट फोटो, आधार कार्ड/राशन कार्ड/पॅन कार्ड |
| २ | रेल्वे प्रवास भाड्यात सूट | जिल्हा सामान्य रुग्णालय | आधार कार्ड, दिव्यांगाचे प्रमाण पत्र व दोन पासपोर्ट फोटो, |
| ३ | घरकुल योजना | पंचायत समिती | जागेचा पूरावा (lej tax) व दिव्यांगाचे प्रमाण पत्र पक्के घर नसावे, १५ वर्ष वास्तव्य आवश्यक (महाराष्ट्र) |
| ४ | नौकरीतील आरक्षण आणि कार्यकाळातील वेळात सूट, अर्धा तास उशिरा जाणे आणि अर्धा तास लवकर घरी येणे | शासन निर्णय | दिव्यांगाचे प्रमाण पत्र, जन्माचा पुरावा, दोन पासपोर्ट फोटो, आधार कार्ड/राशन कार्ड/पॅन कार्ड |
| ५ | शैक्षणिक क्षेत्रातील वेळात सूट आणि साहित्याची पूर्तता, परीक्षेच्या कालावधीत पेपर सोडविण्यासाठी रायटर असतो | शासन निर्णय | दिव्यांगाचे प्रमाण पत्र, जन्माचा पुरावा, दोन पासपोर्ट फोटो, आधार कार्ड/राशन कार्ड/पॅन कार्ड |
| ६ | आर्थिक विकासाच्या योजना | अपंग वित्त व विकास महामंडळ | दिव्यांगाचे प्रमाण पत्र, जन्माचा पुरावा, दोन पासपोर्ट फोटो, आधार कार्ड/राशन कार्ड/पॅन कार्ड |
| ७ | संजय गांधी निराधार योजना | तहसील कार्यालय | दिव्यांगाचे प्रमाण पत्र, जन्माचा पुरावा, दोन पासपोर्ट फोटो, आधार कार्ड/राशन कार्ड/पॅन कार्ड उत्पन्न दाखला, बँक खात्यासोबत स्वलग्न आधार |
| ८ | मनोधैर्य योजना | जिल्हा विधिसेवा प्राधिकरण जिल्हा स्तरावर | दिव्यांगाचे प्रमाण पत्र, जन्माचा पुरावा, दोन पासपोर्ट फोटो, आधार कार्ड/राशन कार्ड/पॅन कार्ड |
| ९ | दिव्यांग व्यक्ती कल्याणार्थ ग्रामपंचायत मधून दरवर्षी अपंग व्यक्तीला ५% निधी वितरीत करण्यात येतो. | ग्रामपंचायत जाऊन अपंग निधी मागणे | दिव्यांगाचे प्रमाण पत्र, आधार कार्ड |
| १० | अपंग-अव्यंग व्यक्तींच्या विवाह प्रोत्साहन योजना | समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद | दिव्यांगाचे प्रमाण पत्र, जन्माचा पुरावा, दोन पासपोर्ट फोटो,आधार कार्ड,विवाह नोंदणी प्रमाणपत्र, वय व अधिवास प्रमाण पत्र बँक पासबुक जोडीचा फोटो, लग्नपत्रिका, एक वर्षाच्या आत फार्म भरणे. |

(टीप:- वरती नमूद केलेल्या कार्यलयात जाऊन चौकशी करावी आणि रीतसर फॉर्म भरून घ्यावे. वेळोवेळी होणारे बदल लक्ष्यात घावे.)




मार्गदर्शक संस्था

आम्ही आमच्या आरोग्यासाठी

अधिक माहितीसाठी संपर्क :

आम्ही आमच्या आरोग्यासाठी

पत्ता : मु. पो. तह. : कुरखेडा, जिल्हा- गडचिरोली
( महाराष्ट्र राज्य ) - ४४१२०९

9421006699
9404227714
Email : arogyasathi@gmail.com
Website : www.arogyasathi.org


*Initiative Supported By*

BAJAJ FINSERV

# विदर्भ दिव्यांग संघटना


पत्ता : आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्थेचे कार्यालय
ता. कुरखेडा-४४१२०९ जि. गडचिरोली, महाराष्ट्र

मार्गदर्शक संस्था
आम्ही आमच्या आरोग्यासाठी

M. 7620485174
9421045267
9404227714


## दिव्यांग व्यक्तींना संघटीत होण्याची गरज का आहे ?



२०११ च्या जनगणना नुसार भारत देशात २.६८ कोटी व्यक्ति दिव्यांग आहेत जे एकूण लोकसंख्येच्या २.२१ टक्के आहे. हयापैकी ६९ टक्के दिव्यांग हे ग्रामीण भागात राहतात तर ३१ टक्के शहरांमध्ये राहतात. गडचिरोली जिल्ह्यात २०१९-२०२० मध्ये आरोग्य विभागाने आशा मार्फत घरोघरी जाऊन दिव्यांग व्यक्तींचा सर्व्हे केला. जिल्ह्यातील या सर्व्हेक्षणात एकूण २००९० ( वीस हजार नव्वद ) दिव्यांगांची नोंद करण्यात आली. हे प्रमाण जिल्ह्यातील एकूण लोकसंख्याच्या २ टक्के आहे. तरी ही आकडेवारी 'दिव्यांग व्यक्तींसाठी ( समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग ) अधिनियम १९९५' या कायद्या अंतर्गत असून १० च दिव्यांगता प्रकारबाबत आहे. 'दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६' यामध्ये दिव्यांगांचे २१ प्रकार आहेत. त्या आधारावर सर्वेक्षण केले तर आज ही संख्या यापेक्षाही अधिक वाढेल. तरीही या नोंद केलेल्या एकूण दिव्यांगांपैकी फक्त २३६१ दिव्यांगांकडे दिव्यांगता प्रमाणपत्र आहे जे दिव्यांग व्यक्तीच्या एकूण संख्येच्या १२ टक्केच आहे.

दिव्यांग व्यक्तीला दिव्यांग म्हणून ओळख मिळविण्यासाठी शासनाकडून दिव्यांगता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. दिव्यांग प्रमाणपत्र असल्यावरच त्यांना कायदेशीर ओळख प्राप्त होते अन्यथा प्रमाणपत्राअभावी प्रत्यक्षात दिव्यांग असलेल्या व्यक्तींना कायदेशीररित्या दिव्यांग म्हणून मान्यताच नाही. त्यामुळे आपोआपच ते शासनाच्या धोरण, योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. दिव्यांगांना कुटुंब तसेच समाज पातळीवर सामाजिक भेदभावाला तोंड द्यावे लागते. निरक्षितपणा किंवा अपुरे शिक्षण, अधिकार आणि योजनांची माहिती/जाणीव नसणे, संघटन शक्तीचा अभाव, नेतृत्वाचा अभाव, अंतर्गत कलह, अपुऱ्या दळणवळणाच्या सुविधा, प्रशासनाची नैराश्यवादी भूमिका यामुळे दिव्यांगांना सतत अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. दिव्यांगांच्या प्रकारानुसार होणारे शोषणही विविध प्रकारचे असून अतिशय गंभीर आहेत. दिव्यांग महिला असेल, त्यात ही मानसिक रुग्ण असेल तर कुटुंब आणि समाज दोन्ही पातळीवर तिच्यावर होणारे अत्याचार भयावह आहेत. परंतु यावर बोलणार कोण?

संघटन शक्तीच्या अभावी ज्यांना आपण निवडून दिले ते लोकप्रतिनिधी ही बोलत नाहीत आणि प्रशासन आपले म्हणणे ऐकत नाही. संघटने अभावी दिव्यांगांचे प्रश्न चर्चेतही येत नाहीत आणि ते शासनापुढे दबावपूर्वक मांडले ही जात नाहीत. स्वातंत्र्याचे ७५ वर्षे होऊनही दिव्यांगांचे प्रश्न आज तसेच आहेत. अथक संघर्षांनंतर भारतात कायदे आणि योजना बनविण्यात आल्या असल्या तरी त्यावर अमलबजावणी अजूनही अत्यल्पच आहे. अशावेळी भारत देशातील एक सन्माननीय नागरिक म्हणून स्वाभिमानी जीवन जगायचे असेल तर संघटित होवून काम करण्याशिवाय गत्यंतर नाही. दिव्यांगांनी हे जाणून सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक व्यवस्थेत समान स्थान आणि संधी मिळविण्यासाठी संविधांनाचा आधार घेवून कायदेशीर संघर्ष केले पाहिजे.

चला तर मग एकत्रित येऊयात, संघटित होऊयात. पण हे सगळे करणार कसे? काय असते हे संघटन आणि कसे काम करते? कोणकोण असतील या संघटनेत? कुणी या संघटनांचा गैरफायदा तर घेणार नाही ना? या सर्व प्रश्नांचा अतिशय गांभीर्याने विचार करून स्वत: दिव्यांगांचे संघटन उभे राहिले तरच ते कार्यक्षमतेने प्रभावी काम करू शकेल. त्यासाठी अस्तीत्वात असलेले संघटन मजबूत करणे तसेच जिथे नाही तिथे नव्याने संघटन निर्माण करावे.



# संघटन शक्ती म्हणजे काय ?
## आणि संघटनेची गरज का आहे?




कोणतीही व्यक्ति एकट्याने शोषणाच्या विरोधात संघर्ष करीत असेल तर ते फार काळ टिकणारे नसते किंवा प्रभावी ठरत नाही परंतु त्याच वेळी एकापेक्षा अधिक व्यक्ती एकत्रित येवून स्वतःच्या प्रश्नांवर चर्चा व अभ्यास करून प्रश्न सोडविण्यासाठी संघटितपणे काम करतात ते अधिक प्रभावी असते. दिव्यांग संघटनेची गरज ही दिव्यांग व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या सामाजिक, आर्थिक समस्यावर चर्चा करणे तसेच शासकीय कामकाजात येणाऱ्या अडचणी सोडविणे, दिव्यांगांना मदत व मार्गदर्शन करणे, दिव्यांग व्यक्तीचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचवावा आणि त्यांना सन्मानाचा जीवन जगता यावे यासाठी प्रयत्न करणे आहे.




### संघटनेचे ध्येयः

दिव्यांग व्यक्तींना समाजामध्ये इतर व्यक्तीप्रमाणे समतेने, स्वाभिमानाने आणि सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी कार्य करणे.

### संघटनेची उद्दिष्ट्ये :

H दिव्यांग व्यक्तींना संघटित करणे व त्यांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय सक्षमीकरण करण्यास मदत व मार्गदर्शन करणे.

दिव्यांग व्यक्तींना सक्षम करणे आणि सक्षम व्यक्तींना इतर दिव्यांग व्यक्तिप्रती संवेदनशील बनविणे.

H दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या कायद्याची जाणीव करून देणे.

H समाजात दिव्यांग व्यक्तीबाबत सामाजिक जागरूकता व संवेदनशीलता निर्माण करणे

H ग्रामपंचायत मध्ये दिव्यांग व्यक्तीला स्थान मिळवून देण्यासाठी मदत करणे.

H दिव्यांग व्यक्तीला अधिकाराची आणि हक्काची जाणीव करून देणे. ज्यात 1) सन्मानाने जगण्याच्या हक्क 2) शिक्षणाचा हक्क 3) मतदानाचा हक्क 4) कामाचा हक्क 5) वारसा हक्क 6) बोलण्याचा हक्क 7) लिखाण करण्याचा हक्क 8) संपत्तीचा हक्क 9) सहजीवनाचा हक्क 10) लग्न न करता एकत्र राहण्याचा हक्क इत्यादी.

H दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनाची माहिती देणे व लाभ मिळविण्यासाठी मदत व मार्गदर्शन करणे.

### दिव्यांग व्यक्तीवर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिरोध करणेः

जसे 1) मुलभूत अधिकाराचा उल्लंघन होत असल्यास 2) चोरीचा आळ 3) लैंगिक ,आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण / हिंसा होत असल्यास 4) प्रगतीची संधी नाकारणे 5) शिक्षणाचा अधिकार नाकारणे 6) पायाभूत सुविधा उपलब्ध असून न मिळणे

**आपण दिव्यांग असाल आणि आपलेही प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेची मदत आपल्याला होवू शकते असे वाटत असल्यास आपल्या क्षेत्रात असलेल्या दिव्यांग व्यक्तीच्या संघटनेत सहभागी व्हा आणि दर महिन्याला होणाऱ्या सभेत नियमितपणे हजर राहून आपले प्रश्न आणि समस्यांवर चर्चा करा. नियमितपणे शासकीय अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार, संवाद आणि समन्वयन करा.**

मार्गदर्शक संस्था

*Initiative Supported By*

BAJAJ FINSERV

### अधिक माहितीसाठी संपर्क :

**आम्ही आमच्या आरोग्यासाठी**
कुरखेडा, जि. गडचिरोली
9421006699 • 9404227714
**Email :** arogyasathi@gmail.com • **Website :** www.arogyasathi.org



AMHI AMCHYA AROGYASATHI
www.arogyasathi.org
easepwd.arogyasathi@gmail.com

# दिव्यांग बेरोजगार युवक-युवतींसाठी
# प्रशिक्षण व रोजगार संधी

Initiative Supported By BAJAJ FINSERV

॥ व्यंग नव्हे ही कमतरता, माझ्यात ही आहे क्षमता, नको दया नको सहानुभूती, करा दिव्यांगांच्या विशेष गरजांची पूर्ती ॥

आम्ही आमच्या आरोग्यासाठी ही संस्था १९८४ पासून लोकांच्या सक्षमिकरणाचे काम करीत आहे. २००१ पासून दिव्यांग व्यक्तीचे समाज आधारीत पूनर्वसन करण्याचे काम सुरू आहे. दिव्यांग बेरोजगार युवक-युवतीसाठी कौशल्य वाढवून त्यांच्यात वेगवेगळ्या क्षमता निर्माण करुन संबधीत क्षेत्रात त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी फेब्रुवारी २०१६ पासून प्रशिक्षण केंद्र सुरु केले आहे. सध्या मुकबधीर/कर्णबधीर प्रवर्गाच्या युवक युवतींसाठी १ महिण्याचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षण व तसेच अस्थीव्यंग आणि अल्पदृष्टी प्रवर्गातील युवक युवतीसाठी १५ दिवसाचे मोफत ऑफलाईन ( क्लास रूम ) प्रशिक्षण कुरखेडा, जिल्हा गडचिरोली येथे घेतले जात आहे आणि प्रशिक्षण झाल्यावर खाजगी क्षेत्रात रोजगार मिळवून देण्यास मदत करीत आहे. मार्च २०२४ पर्यंत १२९२ दिव्यांग युवक युवतींना प्रक्षिशित करुन ६५% दिव्यांग युवक युवतींना खाजगी कंपन्यामध्ये रोजगार मिळवून दिला आहे. जर आपणही दिव्यांग असाल आणि आपले उज्वल भविष्य घडविण्याचे स्वप्न बघत असाल तर, चला मग आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्थेच्या वतीने नागपूर येथे एक महिण्याचे ऑनलाईन व कुरखेडा येथे १५ दिवसाच्या ऑफलाईन कौशल्य विकास कार्यक्रमामध्ये सामील होऊन प्रशिक्षण घेवूया.

**ऑफलाईन प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींना जेवणाची व राहण्याची सुविधा मोफत देण्यात येईल.**








## प्रशिक्षण स्थळ

Social Media

नागपूर : आम्ही आमच्या आरोग्यासाठी, प्लॉट नं.१ दत्त अपार्टमेंट, साईकृपा सोसायटी, नरेंद्र नगर, नागपूर

**Contact : 0712 2780586**

कुरखेडा : आम्ही आमच्या आरोग्यासाठी प्रमोद पेट्रोल पंप जवळ, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली

### पात्र उमेदवाराला खालील विषयांवर प्रशिक्षण दिले जाईल

## १. कोर्स तपशील:

- संगणक – कॉम्पुटर (Microsoft Office, internet, typing)
- स्पोकन इंग्लिश (इंग्रजीचे ज्ञान)
- व्यक्तिमत्व विकास
- बीपीओ आणि आतिथ्य
- कार्य एक्सपोजर (कामाचा अनुभव)
- वैयक्तिक प्रोफाइल बनविणे आणि मुलाखतिचे कौशल्य प्राप्त करणे
- रिटेल
- ई–कॉमर्स
- स्वयंरोजगार प्रशिक्षण.

## ३.पात्रता

- उमेदवाराने नियमित पणे सुट्या न घेता १५ दिवसांचे ऑफलाईन व ३० दिवसांचे ऑनलाईन प्रशिक्षण घेणे व प्रशिक्षणानंतर कुठेही ही जॉब करण्याची तयारी तसेच कामाच्या ठिकाणी चांगली वागणूक व कामगिरी असणे आवश्यक आहे.
- किमान दहावी पास किंवा नापास.
- वय १८ ते ३५ वर्ष दरम्यान असावे.
- फक्त अस्थिव्यंग, मुकबधीर / कर्णबधीर, अल्पदृष्टी व सिकलसेल या दिव्यांग प्रवर्गासाठी

**शारीरिकदृष्ट्या दिव्यांग तरुण-तरुणी ( कमीतकमी ४०% दिव्यांगत्व असलेले ) आणि मूकबधिर तरुण-तरुणी ( कमीतकमी ५०% दिव्यांगत्व असलेले ) या प्रशिक्षण कार्यक्रमात पात्र आहेत.**

## २.आवश्यक कागदपत्रे

१ ) शाळा सोडल्याचा दाखला (१०वी ) २ ) १० पासूनच्या शिक्षण घेतलेल्या सर्व गुणपत्रिका ३ ) दिव्यांगता प्रमाणपत्र ४ ) आधार कार्ड ५ ) राशन कार्ड ६ ) अर्जदाराचे ४ पासपोर्ट फोटो ७ ) पॅन कार्ड ८ ) बँक पासबुक ९ ) कोव्हीड व्हक्सीन सर्टीफीकेट

## आपले विनित

**डॉ. सतिश गोगुलवार**
संयोजक
आम्ही आमच्या आरोग्यासाठी, कुरखेडा
इमेल : arogyasathi@gmail.com

**श्रीमती शुभदा देशमुख**
संस्थापक सदस्य व ट्रस्टी
आम्ही आमच्या आरोग्यासाठी, कुरखेडा
इमेल : arogyasathi@gmail.com

**मुकेश शेंडे**
संचालक
आम्ही आमच्या आरोग्यासाठी, नागपूर
इमेल : mukesh.arogyasathi@gmail.com

**मनोज मेश्राम**
प्रकल्प व्यवस्थापक
इमेल : manoj.aaa2018@gmail.com

**संगिता तुमडे**
विषय समन्वयक-समुदाय आधारित पुनर्वसन
M. 9404227714 VOICE CALL /

**सपन वाघमारे**
विषय समन्वयक-कौशल्य विकास व रोजगार प्रशिक्षण
M. 9021049966 इमेल : sapan.arogyasathi@gmail.com

**अधिक माहितीसाठी संपर्क**
8698883491
VOICE CALL, VIDEO CALL /

cake-links Always around you lifestyle DMart KFC SMART Reliance trends KGV TALKING HANDS MERIDIEN Domino's Pizza Valeo bigbasket Flipkart Café Coffee Day amazon.in TATA VINDHYA Wonder Grass IndiGo

AMHI AMCHYA AROGYASATHI
www.arogyasathi.org
easepwd.arogyasathi@gmail.com

# बेरोजगार दिव्यांग युवाओं के लिए कौशल विकास और रोजगार अवसर

Initiative Supported By BAJAJ FINSERV

**प्रशिक्षण के लिए संपर्क कार्यालय : आम्ही आमच्या आरोग्यासाठी, श्री दत्ता अपार्टमेंट, नरेंद्र नगर, नागपूर फोन ०७१२-२७८०५८६**

आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था १९८४ से लोगो के सशक्तिकरण के लिए कार्य कर रही है । साथ ही वर्ष २००१ से दिव्यांग व्यक्ती के समाज आधारित पुनर्वसन के लिए कार्य कर रही है । आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था ने वर्ष २०१६ से नागपुर में दिव्यांग युवाओं के लिए कौशल विकास और रोजगार प्रशिक्षण केंद्र शुरू किया है । दिव्यांग युवाओं को नागपुर और कुरखेडा में प्रशिक्षित किया जाता है तथा उन्हे रोजगार दिलाने मे मदत की जाती है । जिसमे मुक-कर्णबधीर दिव्यांगोके लिये ३० दिन ऑनलाइन तथा अस्थिव्यंग, अल्पदृष्टी दिव्यांगो के लिये १५ दिन ऑफलाईन होता है । इस केंद्र के तहत जनवरी २०१६ से मार्च २०२४ तक करीब १२९२ दिव्यांग युवक युवतीओ को प्रशिक्षित किया है जिसमे से ६५ प्रतिशत युवाओ को रोजगार मिला है ।

**ऑफलाईन प्रशिक्षण लेनेवाले प्रशिक्षणार्थीयोंको भोजन तथा निवास की सुविधा निःशुल्क दि जायेगी ।**








**प्रशिक्षण स्थल**

Social Media

नागपूर : आम्ही आमच्या आरोग्यासाठी, प्लॉट नं.१ दत्त अपार्टमेंट, साईकृपा सोसायटी, नरेंद्र नगर, नागपूर
**Contact : 0712 2780586**
कुरखेडा : आम्ही आमच्या आरोग्यासाठी प्रमोद पेट्रोल पंप जवळ, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली

## पात्र उम्मीदवारों को निम्मलिखीत विषयोपर प्रशिक्षण दिया जायेगा ।

### १. कोर्स तपशील:

- संगणक – कॉम्पुटर (Microsoft Office, internet, typing)
- स्पोकन इंग्लिश (अंग्रजी भाषा का ज्ञान)
- व्यक्तिमत्व विकास
- बी.पी.ओ. और आतिथ्य (Hospitality )
- कार्य एक्सपोजर (कार्य अनुभव)
- वैयक्तिक प्रोफाईल बनाना और साक्षात्कार कौशल्य प्राप्त करना
- रिटेल
- ई-कॉमर्स
- स्वयंरोजगार प्रशिक्षण

### ३. पात्रता

- उम्मीदवार नियमित रुप से छुट्टी लिये बैगर १५ दिन का ऑफलाईन तथा ३० ऑनलाईन प्रशिक्षण लेना तथा प्रशिक्षण के बाद कहीभी में काम करने की तैयारी तथा नोकरी की जगह अच्छा व्यवहार व कार्य करना अनिवार्य है ।
- किमान दसवी उत्तीर्ण या अनुतीर्ण
- आयु १८ से ३५ वर्ष दरम्यान होनी चाहीये ।
- प्रशिक्षण सिर्फ अस्थिव्यंग, मुकबधीर, कर्णबधीर, अल्पदृष्टी और सिकलसेल इस दिव्यांग प्रवर्गो के लिए।

**शारीरिक रुपसे दिव्यांग युवा-युवती ( कमसे कम ४०% दिव्यांगता ) और मूक /कर्ण बधिर युवा-युवती ( कमसे कम ५०% दिव्यांगता ) इस प्रशिक्षण कार्यक्रम में पात्र होंगे ।**

### २.आवश्यक दस्तावेज

१ ) लिव्हींग सर्टीफीकेट ( टी.सी. ) १०वी २ ) १० वी से अधिक शिक्षा की गुणपत्रिका
३ ) दिव्यांगता प्रमाणपत्र ४ ) आधार कार्ड ५ ) राशन कार्ड ६ ) उम्मीदवार के ४ पासपोर्ट फोटो
७ ) पॅन कार्ड ८ ) बँक पासबुक ९ ) कोव्हीड व्हॅक्सीन सर्टीफीकेट

## ।। विनित ।।

**डॉ. सतिश गोगुलवार**
संयोजक
आम्ही आमच्या आरोग्यासाठी, कुरखेडा
इमेल : arogyasathi@gmail.com

**श्रीमती शुभदा देशमुख**
संस्थापक सदस्य व ट्रस्टी
आम्ही आमच्या आरोग्यासाठी, कुरखेडा
इमेल : arogyasathi@gmail.com

**मुकेश शेंडे**
संचालक
आम्ही आमच्या आरोग्यासाठी, नागपूर
इमेल : mukesh.arogyasathi@gmail.com

**मनोज मेश्राम**
प्रकल्प व्यवस्थापक
इमेल : manoj.aaa2018@gmail.com

**संगिता तुमडे**
विषय समन्वयक-समुदाय आधारित पुनर्वसन
M. 9404227714 VOICE CALL /

**सपन वाघमारे**
विषय समन्वयक-कौशल्य विकास व रोजगार प्रशिक्षण
M. 9021049966 इमेल : sapan.arogyasathi@gmail.com

**अधिक जानकारी हेतू संपर्क**
**8698883491**
VOICE CALL, VIDEO CALL /